नवी मुंबई महानगरपालिका
क्रीडा व सांस्कृतिक विभाग
भारतरत्न राजीव गांधी क्रीडा संकुल,
से.३ए, सी.बी.डी.,बेलापूर, नवी मुंबई
दुरध्वनी - 27573294

जाहिरात क्रं. नमुंमपा/क्रीडा व सांस्कृ./टेक्र1/प्रक्र.59/ 173/2017, दि.22/03/2017

<u>नवी मुंबई महानगरपालिकेच्यावतीने कबड्डी, खो-खो व शुटींगबॉल खेळाचे खेळाडू दत्तक घेवुन व्यावसायिक संघ तयार करणेकरीता खेळाडूंकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.</u>

राज्यातील जास्तीत जास्त खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धामध्ये सहभागी होता यावे याकरीता राज्यात क्रीडा विषयक बाबींना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने शासनाने निश्चित केलेल्या धोरणानुसार नवी मुंबई महानगरपालिका शहरातील उदयोन्मुख क्रीडापटूंना अधिकाधिक प्रोत्साहन देण्याच्या हेतुने नवी मुंबई महानगरपालिकेच्यावतीने कबड्डी, खो-खो व शुटिंगबॉल या खेळाचे व्यवसायिक संघ तयार करणेकामी नमुद खेळाच्या खेळाडू पदाकरीता खालील अटी व शर्तीस अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहे.

1. कबड्डी, खो-खो व शुटिंगबॉल या खेळाचे संघ दत्तक घेण्याच्या दृष्टीने संबंधित खेळातील शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त खेळाडू, तसेच जिल्हा व राज्य क्रीडा संघटनेच्या माध्यमातून कबड्डी-15, खो-खो-15 व शुटिंगबॉल-10 खेळाडूंची निवड करण्यात येईल.
2. सदरहू खेळाडूंची नावे निश्चित करतांना यामध्ये विद्यापीठ, राज्य व राष्ट्रीयस्तरावर संघाचे प्रतिनिधीत्व केलेले कबड्डी-10, खो-खो-10 व शुटिंगबॉल-06 खेळाडू आणि जिल्हास्तरावरील नवोदित कबड्डी-05, खो-खो-05 व शुटिंगबॉल-04 खेळाडू अशी नावे निश्चित करण्यात येतील. यामध्ये नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील खेळाडूंना प्राधान्य राहील. परिपुर्ण संघाच्या बांधणीकरीता नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील खेळाडू उपलब्ध न झाल्यास महाराष्ट्रातील इतर जिल्हयातील खेळाडूंचा विचार करता येईल.
3. खेळाडूंच्या नियुक्त्या शासनाने सुचित केल्याप्रमाणे विहित नियमानुसार कंत्राटी /करार पध्दतीने असतील. त्यांना सेवेत कायम स्वरुपी करण्यासाठी दावा करण्याचा हक्क राहणार नाही.
4. निवड झालेल्या खेळाडूंना वेळोवेळी सरावास उपस्थित राहणे बंधनकारक राहील.
5. खेळाडूंची नियुक्ती करण्याकरीता गठित करण्यात आलेल्या समितीमार्फतच खेळाडूंची निवड करण्यात येईल.
6. सरावादरम्यान अथवा स्पर्धेदरम्यान दुखापत झाल्यास त्यावरील उपचार महानगरपालिका रुग्णालयात मोफत करण्यात येईल.
7. खेळाडूंची किमान पात्रता विचारात घेता खुल्या गटाचा राज्य अजिंक्यपद स्पर्धेतील प्राविण्यप्राप्त खेळाडू तसेच एकविध संघटनाव्दारा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी खेळाडूंची निवड करता येईल
8. एखादा खेळाडू अपेक्षित कामगिरी करत नसल्यास त्याचा करार रद्द करता येईल. त्याकरीता दत्तक योजने अंतर्गत निवड झालेल्या खेळाडूंना रु.100 च्या स्टॅम्प पेपरवर बंधपत्र द्यावे लागेल.
9. सदर व्यावसायिक संघांतील खेळाडूंना <u>**प्रतिमाह रु.15,000/-**</u> याप्रमाणे ठोक मासिक मानधन अदा करण्यात येईल.
10. करार/कंत्राटावर निवडण्यात आलेले खेळाडूंचा वार्षिक प्रगतीचा आढावा घेऊन पुढील करार वाढविण्याबाबत मा.आयुक्त यांचकडे प्रस्तावित करण्यात येईल व याबाबतचे सर्वाधिकार मा.क्रीडा समितीला असतील.
11. खाजगी संस्थेत नोकरी करत असणा-या तसेच शालेय/विद्यापीठात शिक्षण घेत असणा-या व विहित नियमानुसार पात्र ठरणा-या खेळाडूंस मासिक मानधनाऐवजी स्पर्धा

कालावधी व स्पर्धेकरीतांचे प्रवास दिवसांकरीता प्रतिदिन रु.1000/- प्रमाणे भत्ता देय असेल.

12. नवी मुंबई महानगरपालिका संघ कोणत्याही स्पर्धेत सहभागी झाल्यानंतर स्पर्धेत पारितोषिक रक्कम मिळाल्यास सदर मिळालेली रक्कम स्पर्धेत सहभागी खेळाडू, प्रशिक्षक व व्यवस्थापक यांच्यात वाटप करण्यात येईल. मात्र स्पर्धेतील स्मृतीचिन्ह नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा विभागात जमा करतील.
13. स्पर्धेत संघाच्या सहभागासाठी जर स्पर्धा आयोजक प्रवास अदा करणार नसतील तर अशा स्पर्धेत सहभागासाठी (जाणे-येणेकरीता) येणारा प्रवास खर्च तसेच प्रवासादरम्यानचा खर्च महापालिकेच्या वतीने करण्यात येईल.
14. निवड झालेल्या खेळाडू व मार्गदर्शक यांना सराव व स्पर्धेदरम्यान क्रीडा गणवेश व इ. आवश्यक साहित्य आवश्यकतेनुसार मोफत उपलब्ध करुन देण्यात येईल.
15. खेळाडूनां एकुण मासिक ठोक मानधना व्यक्तिरिक्त नियमित कर्मचा-यांप्रमाणे इतर कोणतेही हक्क/अधिकार/लाभ मिळणार नाहीत.
16. उक्त नमुद नेमणुक मासिक ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात असेल. खेळाडू अपेक्षीत कामगीरी करत नसल्यांस त्यांचा करार समाप्त करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त यांचे राहतील.
17. उक्त अर्हता धारण करणा-या उमेदवारांच्या कागदपत्राची छाननी करुन पात्र उमेदवारांच्या मुलाखती अंती अंतिम निवड यादी जाहीर करण्यात येईल.

उक्त प्रमाणे पात्रता धारण करणा-या खेळाडूंनी दि.25 एप्रिल 2017, साय.5 वाजेपर्यंत आपल्या खेळाबाबतच्या प्राविण्य प्रमाणपत्राच्या प्रमाणित छायाकिंत प्रतीसह खालील पत्यावर अर्ज सादर करावेत. **अर्ज करताना लिफाफ्यावर आपण ज्या खेळाच्या संघात खेळाडू म्हणुन अर्ज केलेला आहे त्या खेळांचे नाव मोठ्या व ठळक अक्षरा नमुद करावे.**

**अर्ज करण्याचा कार्यालय पत्ता :**

मा.शिक्षणाधिकारी तथा विभाग प्रमुख<br>
क्रीडा व सांस्कृतिक विभाग.<br>
भारतरत्न स्व.राजीव गांधी क्रीडा संकुल,<br>
सेक्टर-3,सी.बी.डी.,बेलापूर,नवी मुंबई.<br>
फोन - 27573294

सही/-<br>
(संदीप संगवे)<br>
शिक्षणाधिकारी तथा विभागप्रमुख<br>
(क्रीडा व सास्कृतिक विभाग)<br>
नवी मुंबई महानगरपालिका

# अर्जाचा नमुना

| पासपोट आकाराचा फोटो चिटकवून स्वतः साक्षांकीत करावे. |
|---|

( ---------------------या खेळाच्या संघाकरीताचा अर्ज )

**प्रति,**
**मा. आयुक्त,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

1. संपुर्ण नाव : -----------------------------------------
( प्रथम आडनाव )

2. पत्ता : ------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------
-------------------------------

3. संपर्क क्रं. : -----------------------Email ID-----------

4. जन्मतारीख

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

वय दि.01/01/2017 रोजीचे वय

| वर्ष | महिना | दिवस |
|---|---|---|
| | | |

5. शैक्षणिक अहर्ता :-

| उत्तीर्ण केलेली परीक्षा | विद्यापीठ /मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | विषय | टक्केवारी / श्रेणी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

6. नोकरी करीत असल्यांस :-

| संस्थेचे नाव व पत्ता | कार्यरत असलेल्या पदाचे नाव | कालावधी | | एकुण वर्ष |
|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

7. विद्यापीठ, जिल्हा, राज्य व राष्ट्रीयस्तरावर खेळातील कामगीरीबाबतची माहिती...

| स्पर्धा | दिनांक | स्थळ | आयोजक | स्थान/क्रमवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

-

8. अवगत असणा-या भाषा :

| भाषा | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| --- | --- | --- | --- |
| | | | |

9.प्रवर्ग :

| खुला | अ.जा. | अ.ज. | इतर |
| --- | --- | --- | --- |
| | | | |

10. आपणास विरुध्द न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इ. कारवाई चालू आहे काय ? होय/ नाही....असल्यास थोडक्यात तपशील द्यावा)

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

11. अर्जासोबत खालील (छायांकित) सत्य प्रती जोडलेल्या आहेत.

1)
2)
3)
4)
5)

वर नमूद केलेली सर्व माहिती खरी असून ती खोटी आढळल्यास माझी कोणत्याही टप्प्यावर नेमणूक रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :-**

( )

**दिनांक :-** उमेदवाराची नाव व सही